# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

## (स्वायत्त महाविद्यालय)

# राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रमाचा अहवाल व लेखे

# 2018-19

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

## राष्ट्रीय सेवा योजना

# २०१८-१९

# नियमित कार्यक्रमाचा अहवाल

# व

# जमा खर्च

**कार्यक्रमाधिकारी**

डॉ.के.डी.सावंत

डॉ.पी.जी.त्रिमुखे

डॉ. एस.व्ही. पाटील

**प्राचार्य**

डॉ.एम.एच.गव्हाणे

# राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर
# राष्ट्रीय सेवा योजना
# वार्षिक अहवाल २०१८-१९

## दि. ०१.०४.२०१८ ते ३१.०३.२०१९

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचा विभाग सतत कार्यरत असतो. या विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास, श्रमप्रतिष्ठा आणि सामाजिक कार्याची जाणीव निर्माण करुन देण्याचे काम हा विभाग सतत करत आलेला आहे. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये २५० विद्यार्थी स्वंयसेवकांची संख्या मंजुर करण्यात आलेली आहे. तर राष्ट्रीय सेवा योजना प्रतिनिधी म्हणून विशाल जाधव व माधुरी कोते यांची निवड करण्यात आलेली आहे. या विभागाच्यावतीने वर्षभरात विद्यार्थ्यांकडून विविध उपक्रम राबविण्यात येतात.

त्यामध्ये प्रामख्याने स्वच्छता अभियान, लोकमान्य टिळक पुण्यतिथी व आण्णा भाऊ साठे जयंती, जागतिक राष्ट्रीय सेवा योजना दिन, पर्यावरण संवर्धन, प्लस पोलिओ अभियान, एड्स विरोधी जनजागरण रॅली, पोलीस रेझिन डे, रस्ता सुरक्षा अभियान सप्ताह, पर्यावरण संवर्धन, एकता दौड, गांधी जयंती, जागतिक योगा दिन, विशेष युवक शिबीर, स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती, क्रांती दिन, स्वातंत्र्य दिन, मराठवाडा हैद्राबाद मुक्ति दिन, प्रजासत्ताक दिन, राष्ट्रीय युवक सप्ताह दिन, निसर्ग सहल आणि प्रजासत्ताक दिनानिमित्त कार्यक्रम व उपक्रम घेण्यात येतात.

सन २०१८-१९ च्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्याची सुरुवात समन्वय समितीच्या बैठकीत होते. स्थानिक समन्वय समितीची बैठक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत खालील ठरावावर विचार विनीमय करुन ते ठराव मंजूर करण्यात आले.

१) या वर्षीच्या प्रवेश प्रक्रियेस मंजूरी देण्यात आली.

२) मागील वर्षाच्या कार्यक्रमाबद्दल आढावा घेण्यात आला.

३) या शैक्षणिक वर्षात कोण-कोणते उपक्रम प्रभावीपणे राबवावे याबद्दल ठराव घेण्यात आला.

**विविध उपक्रम खालीलप्रमाणे राबविण्यात आले :**

**१) महात्मा जोतीबा फुले यांची जयंती साजरी : (दि.११ एप्रिल, २०१८)**

दि.११ एप्रिल, २०१६ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात उपप्राचार्य डॉ.एम.एच. गव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा जोतीबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यासोबतच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती १४ एप्रिल रोजी असल्यामुळे दोघेही महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी विद्यार्थी स्वयंसेवक बहुमोल मार्गदर्शन केले. या प्रसंगी उपप्राचार्य प्रा. विलास कांबळे, रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी. सावंत, प्रा.व्ही.ए. गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, विद्यार्थी विशाल जाधव, चव्हाण विष्णू, मोरे प्रतिक्षा इत्यादी उपस्थित होते.

**२) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती : (दि. १४ एप्रिल २०१८)**

शनिवार दि. १४ एप्रिल २०१८ रोजी महाविद्यालयात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांची जियंती १२७वी जयंती मोठ्या उत्सवात साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी. साळुंके, उपप्राचार्य डॉ. एम.एच. गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए.जे. राजू, उपप्राचार्य डॉ. ई.यू. मासूमदार, प्रा. विलास कांबळे, प्रा. एस.जे. फूले, रासयो चे माजी कार्यक्रमाधिकारी प्रा. श्रिहरी तलवारे, प्रा. डी.बी. सोनकांबळे, ग्रंथपाल श्री. एस.बी. मस्के, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. व्ही.ए. गवळी, प्रा. सोमदेव शिंदे व इतर प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**३) महात्मा बसवेश्वर जयंती : (दि.१८ एप्रिल, २०१८)**

बुधवार दि.१८ एप्रिल, २०१८ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील रासेयो विभागातर्फे श्री. महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी. साळूंके यांनी विद्यार्थी स्वयंसेवकांना बहुमोल मार्गदर्शन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. ए.जे. राजू, रासेयो चे कार्यक्रमाधिकारी प्रा. व्ही.ए. गवळी, प्रा. अनिरूद्ध बिराजदार सेवक श्री. स्वामी, श्री. महेश बिडवे, श्री. खाडप महेश, विशाल जाधव, विक्रांत शंके इत्यादी उपस्थित होते.

**४) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती व बुद्ध पोर्णिमा : (दि. ३० एप्रिल, २०१८)**

सोमवार दि. ३० एप्रिल, २०१८ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील रासेयो विभागातर्फे अंधश्रद्धा निर्मूलनकर्ते व ग्रामोद्धारक प्रसिद्ध राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. तसेच बुद्ध पोर्णिमा देखील साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात प्रा. भिमराव पाटील यांनी ग्रामगिता हे पूस्तक प्राचार्य डॉ. एस.डी. साळूंके यांना भेट दिली. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए.जे. राजू, उपप्राचार्य डॉ. ई.यू. मासूमदार, प्रा. एन.एस. पिंपळे, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी. सावंत, प्रा.विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे व महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**५) अन्वेषण शिबीराचे आयोजन : (दि. २० जून, २०१८)**

स्वामी रामानंतद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत लातूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जिल्हास्तरीय अन्वेषण शिबीराचे आयोजन करण्यत आले. या शिबीरासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक डॉ.डी.डी. पवार हे उपस्थित होते. त्याचबरोबर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, रा.से.यो. विभागाचे जिल्हा समन्वयक श्री. संतोष पाटील, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता कावळे आदि उपस्थित होते. या शिबीरामध्ये जिल्ह्यातील एकूण ५७ महाविद्यालयानी सहभाग नोंदवला होता.

**६) आव्हान २०१८ : दि. १८ जून, २०१८**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आयोजित राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर (आव्हान) राष्ट्रीय सेवा योजना विभागातील निलेश चलमले, श्रध्दा स्वामी व माधुरी कोते यांनी स्वा.रा.तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे उत्कृष्ठ प्रतिनिधीत्व करत सहभाग नोंदवला. या दहादिवसीय शिबीरात राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) या भारत सरकारच्या निमलष्करी दलाच्या जवानांनी आपत्तीच्या वेळी स्त:च्या व इतरांच्या जीतीत व मालमत्तेचे रक्षण करण्याचे उत्तम

प्रशिक्षण दिले व ते आमच्या शिबीरार्थींनी आत्मसात केले. शिबीरादरम्यान होणाऱ्या सांस्कृतिक उपक्रमांमध्येही त्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

**७) राजर्षी शाहू महाराज जयंती : (दि.२६ जून २०१८)**

मंगळवार दि.२६ जून, २०१८ रोजी महाविद्यालयामध्ये छत्रपती शाहू महाराज यांची १४४वी जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी. साळूंके, उपप्राचार्य डॉ.एम.एच. गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए.जे. राजू, उपप्राचार्य डॉ. ई.यू. मासूमदार, प्रा.डॉ.के.डी. सावंत, प्रा.विजय ए. गवळी, प्रा.एस.डी. शिंदे, डॉ.पी.जी. कावळे, रा.से.यो. विद्यार्थी प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**८) राष्ट्रीय साक्षरता दिन (दि.०८ जूलै २०१८)**

रविवार दि. ८ जूलै, २०१८ रोजी रासेयो विभागाच्या वतीने महाविद्यालयात राष्ट्रीय साक्षरता दिन साजरा करण्यात आला. या वेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाने कु. मोरे प्रतिसक्षा हीला तीचे वडील वारल्यामुळे व घरची परिस्थिती गरिबीची असल्यामुळे या शैक्षणिक वर्षासाठी दत्तक घेतले व तीच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न करण्याचा संकल्प केला. या कार्यक्रमात उपप्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए.जे. राजू, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी. सावंत, प्रा.विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे व विद्यार्थी प्रतिनिधी विशाल जाधव, विक्रांत शंके, स्वामी श्रध्दा, चव्हाण विष्णू इत्यादी उपस्थित होते.

**९) गुरुपोर्णिमा व ईद-ए-मिलन दिनानिमित्त सामाजिक सलोख्रा कार्यक्रम : (२७ जुलै २०१८)**

दि. २७ जुलै, २०१८ रोजी गुरुपोर्णिमा व ईद-ए-मिलन दिनानिमित्त सामाजिक सलोख्राकार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. सय्यद रफिक पारणेकर यांनी विद्यार्थी स्वंयसेवकांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, माजी डी.वाय.एस.पी. एम.आय.शेख्र, जमात ए. इस्लामी हिंदचे शहराध्यक्ष मा.श्री.अशफाक अहमद, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी. सावंत, डॉ.पी.जी. कावळे, प्रा.व्ही.ए. गवळी, प्रा.सोमदेव शिंदे, प्रा. शेख्र मॅडम इत्यादी उपस्थित होते.

**१०) आण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी : (दि. ०१ ऑगस्ट, २०१८)**

दि. ०१ ऑगस्ट, २०१८ रोजी महाविद्यालयात साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक यांची पूण्यतिथी साजरी करण्यात आली. या प्रसंगी प्रा.भीमराव पाटील यांनी विद्यार्थ्यांना बहूमोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.ई.यु. मासूमदार, उप्रप्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ.ए.जे. राजू, उपप्राचार्य प्रा.विलास कांबळे, प्रर्यवेक्षिका प्रा.सुचिता वाघमारे, प्रा. विजय गवळी, प्रा.एस.डी. शिंदे, महेश बिडवे, विद्यार्थी प्रतिनिधी विशाल जाधव, कु. श्रध्दा स्वामी, रागीणी बनसोडे, प्रतिक्षा मोरे, विष्णू चव्हाण, विक्रांत शंके इत्यादी उपस्थित होते.

**११) स्वातंत्र्य दिन व सामाजिक एकात्मता रॅली : (दि. १५ ऑगस्ट, २०१८)**

दि. १५ ऑगस्ट, २०१८ रोजी ध्वजारोहणानंतर राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील १५० विद्यार्थी स्वयंसेवकांनी स्वातंत्र्य दिनानिमित्त देशाच्या विभिन्न प्रांतातील

राहणाऱ्या लोकांची वेशभूषा परिधान करुन महाविद्यालयापासून गंजगोलाई, गुळमार्केट मार्गे, गांधी चौक ते महाविद्यालयापर्यंत सामाजिक एकात्मता व पर्यावरण बचाओ चा संदशे देत रॅली काढण्यात आली. रॅलीचे उद्घाटन मेजर कॅप्टन डॉ.ओ.व्ही. शहापूरकर व डॉ.एस.जे. कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. सदर रॅली यशस्वी होण्यासाठी प्रभारी प्राचार्य डॉ.ई.यु. मासूमदार, उपप्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, प्रा.विलास कांबळे, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी, डॉ.के.डी. सावंत, प्रा.विजय गवळी, प्रा.एस.डी. शिंदे, विद्यार्थी स्वंयसेवक विशाल जाधव, श्रध्दा स्वामी, विष्णू चव्हाण इत्यादींनी विशेष योगदान दिले.

**१२) १०८ जनांचे भव्य रक्तदान शिबीर : (दि. ३० ऑगस्ट, २०१८)**

दि. ३० ऑगस्ट, २०१८ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व डॉ. भालचंद्र ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने १०६ जनांचे भव्य रक्तदान शिबीर संपन्न झाले. शिबीराचे उद्घाटन शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ.गोपाळरावजी पाटल यांनी, संस्थेचे उपाध्य डॉ.पी.आर. देशमुख, संस्था सचिव प्राचार्य अनिरुध्द जाधव, सहसचिव गोपाळ शिंदे, सदस्य ॲड.एस.टी. मनाळे, श्री आनंद माने, डॉ.सुहास गोरे, श्री शिवाजीराव भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत केले. हे रक्तदान शिबीर यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ.ई.यु. मासूमदार, उपप्राचार्य डॉ.ए.जे. राजू, उपप्राचार्य प्रा.विलास कांबळे, पर्यवेक्षिका सुचिता वाघमारे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी. सावंत, डॉ.पी.जी. कावळे, प्रा.विजय गवळी, प्रा.एस.डी. शिंदे, प्रा.सुरेश पाटील, प्रा.आर.एम. आठवले, प्रा.अनिरूध्द बिराजदार, श्री महेश शिंदे, श्री अमर भोईनवाड, रक्त संक्रमण अधिकारी, डॉ.योगेश गवसाने, पीआरओ दिगंबर पवार, किशोर पवार, मोरतळे प्रशांत व विद्यार्थी प्रतिनिधीनी विशेष प्रयत्न केले.

**१३) वृक्षारोपण कार्यक्रम : (दि. ३१ ऑगस्ट, २०१८)**

दि. ३१ ऑगस्ट, २०१८ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयतील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व लातूर वृक्ष समितीच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या परिसरात श्रीकांत कर्वा व डॉ.गणेश पन्हाळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा.विलास कांबळे, म.न.पा.लातूर चे नगरसेवक इम्रान सय्यद, लातूर वृक्ष चळवळ समितीचे समन्वयक श्री सूपूर्ण जगताप, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी. सावंत, डॉ.पी.जी. कावळे, प्रा.व्ही.ए. गवळी, प्रा.एस.डी. शिंदे, दक्ष नागरिक श्री शहाजी पाटील ॲड. बालाजी इंगळे, डॉ.निलम पन्हाळे, श्री सिकंदर पटेल, श्री ऋषी मुदगडे, महेश बिडवे, विशाल जाधव, विष्णू चव्हाण, प्रतिक्षा मोरे, सेवक गोविंद जाधव व मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी उपस्थित होते.

**१४) कुष्ठरोग मार्गदर्शन कार्यक्रम (दि.१८ सप्टेंबर २०१८)**

दि. १८ सप्टेंबर २०१९ रोजी सहाय्यक संचालक आरोगय सेवा कुष्ठरोग कार्यालय, लातूर येथील कुष्ठरोग तज्ञ डॉ.पी.आर. केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो विभागाच्या वतीने महाविद्यालयात मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. या प्रसंगी उपप्राचार्य प्रा. विलास कांबळे, पर्यवेक्षिका प्रा. सुचिता वाघमारे, रासेयो कार्यक्रमाधिकारी, डॉ.के.डी.सावंत, प्रा. व्ही.ए. गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, विद्यार्थी प्रतिनिधी चव्हाण विष्णू, हारडे अंजली, मोरे प्रतिक्षा,सुतार ईश्वर, विशाल जाधव, निलेश चलमले,

सूमित सूर्यवंशी, स्वामी श्रध्दा व इतर विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**१५) रा.से.यो. परिचय कार्यशाळा : (दि. २४ सप्टेंबर २०१८)**

दि. २४ सप्टेंबर रासेयो दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना परिचय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जेष्ठ पत्रकार श्री. धर्मराज हल्लाळे यांनी विद्यार्थ्यांना बहूमोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ.ए.जे. राजू, उपप्राचार्य विलास कांबळे, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी. सावंत, प्रा.विजय गवळी, प्रा.डी.जी. पालके, प्रा.विजय दळवी, विद्यार्थी प्रतिनिधी विशाल जाधव, विष्णू चव्हाण प्रतिक्षा मोरे, विक्रांत शंके व इतर विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

**१६) रासेयो स्वंयसेवकांचे कुष्ठरोग सर्वेक्षणात योगदान : (दि. २४ सप्टेंबर ते ०९ ऑक्टोबर २०१८)**

दि. २४ सप्टेंबर ते ०९ ऑक्टोबर २०१८ या दरम्यान राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाअंतर्गत 'कुष्ठरोग शोध मोहिम' राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सहा. संचालक आरोग्य सेवा कुष्ठरोग कार्यालय आरोग्य संकुल बार्शी रोड, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आली.

या मोहिमेत महाविद्यालयातील रासेयो एकूण ३० स्वंयसेवकांची १५ टिम व एक सपोर्ट टिम मधील स्वयंसेवकांनी समाजातील सर्व घटकांमध्ये कुष्ठरोगाबाबतची जनजागृती करण्यासाठी लातूर शहरातील विविध परिसरातील वेगवेगळ्या वस्त्यांमध्ये फिरुन १४ दिवसांच्या या सर्वेक्षणात ५२५० परिवारांना भेटी देत कुष्ठरोग विभागाप्रमुख डॉ.शिवकुमार हलकुंडे व पर्यवेक्षक व्ही.जी. साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली संशयीत कुष्ठरुग्णांचा शोध घेण्यासाठी सर्वेक्षण केले व कुष्ठरोग तज्ञ डॉ.आर.पी. केंद्रे यांच्याकडून तपासणी करुन घेतली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे उपप्राचार्य प्रा.विलास कांबळे, रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी. सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, विद्यार्थी प्रतिनिधी विशाल जाधव, माधुरी कोते व इतर स्वयंसेवकांनी शोध मोहिम राबविण्यासाठी परिश्रम घेतले.

**१७) महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्र जयंती निमित्त व्याख्यान : (दि. ०२ आक्टोबर २०१८)**

दि. ०२ ऑक्टोबर २०१८ रोजी महाविद्यलयतील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विवेक वाहिनी विभागातर्फे महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्र जयंती साजरी करुन विवेक वाहिनीचे उद्‌घाटन करण्यात आले. या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते श्री. रंगा राचूरे व माजी रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.श्रीहरी तलवारे यांनी विद्यार्थ्यांना बहूमोल मार्गदर्शन केले. यावेळी विवेकवाहिनी कार्याध्यक्ष डॉ.संभाजी पाटील, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी. सावंत, प्रा. विजय गवळी, प्रा.सोमदेव शिंदे, विक्रांत शंके, विशाल जाधव, विष्णू चव्हाण, प्रतिक्षा मोरे व मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी उपस्थित होते.

**१८) विनामुल्य भव्य अटल आरोग्य शिबिर : (०७ ऑक्टोबर २०१८)**

महाराष्ट्र शासनातर्फे दि. ०७ ऑक्टोबर २०१८ रोजी अटल मैदान, संत तुकाराम सी.बी.एस.ई स्कूल, न्यू एमआयडीसी बार्शी रोड, लातूर येथे विनामूल्य भव्य अटल आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबीरामध्ये राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील

२२७ स्वयंसेवकांनी व प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य विलास कांबळे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी. सावंत, डॉ.पी.जी. कावळे, प्रा.व्ही.ए.गवळी प्रा.एस.डी.शिंदे यांनी सक्रीय सहभाग घेऊन शिबीर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. या प्रसंगी केरळमधील पूरग्रस्तांसाठी गोळा केलेला निधी देखील संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळरावजी पाटील, सचिव अनिरुद्ध जाधव यांच्या हस्ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सूपूर्द केला.

**१९) राष्ट्रीय एकता दिनानिमित्त सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांना अभिवादन : (दि.३१ ऑक्टोबर २०१८)**

दि. ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल यांच्या जयंती निमित्त व राष्ट्रीय एकता दिनानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एकता दौड मध्ये सक्रीय सहभाग घेतला. क्रीडा संकूल लातूर या ठीकाणापासून ही रॅली सुरु होउन टाऊन हॉल च्या मैदानावर रॅलीचे समारोप करण्यात आले. या ठिकाणी जिल्हाधिकारी जी. श्रीकांत यांनी रॅलीतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयातही सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व स्व. इंदिरा गांधी यांची पूण्यतिथी साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य ई.यू.मासूमदार, डॉ.ए.जे.राजू, उपप्राचार्य प्रा.विलास कांबळे, प्रा. सुधिर जाधव, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, डॉ. पुष्पलता कावळे व विद्यार्थी स्वयंसेवक मोठया प्रमाणावर उपस्थित होते.

**२०) एड्स (एचआयव्ही) जनजागृती रॅली : (दि. ०१ डिसेंबर २०१८)**

दि. ०१ डिसेंबर २०१८ रोजी शासकीय आरोग्य विभाग लातूर द्वारा आयेजित रॅलीत राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग घेतला, ही रॅली महाविद्यालयापासून शाहू चौकातील महिलांचे शासकीय हॉस्पिटल ते टाऊन हॉल मैदानावर ह्या रॅलीचे समारोप झाला. ही रॅली यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी, डॉ. पी.जी. कावळे, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. संगीता तोंडकर, प्रा.सी.पी आहाळे महाविद्यालयातील इतर प्राध्यापक व विद्यार्थी स्वयंसेवक चव्हाण विष्णू, मोरे प्रतिक्षा, अंजली हारडे इ. स्वयंसेवकांनी विशेष प्रयत्न केले.

**२१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा : (दि. ६ डिसेंबर २०१८)**

दि. ०६ डिसेंबर २०१८ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे भारतरत्न व राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून महापरिनिर्वाण दिनानिमित्ता त्यांना अभिवादन करण्यात आले, या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा.विलास कांबळे, रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी. सावंत, डॉ. पी.जी. कावळे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, विद्यार्थी प्रतिनिधी विशाल जाधव, स्वामी श्रद्धा, चव्हाण विष्णू, मोरे प्रतिक्षा, हारडे अंजली, कांबळे पांडूरंग व इतर विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**२२) शैक्षणिक वनसहल : (दि. ०९ डिसेंबर, २०१८)**

दि. ०९ डिसेंबर, २०१८ रोजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने किल्लेधारुर, अंबाचौंडी व आंबेजागाई (मुकूंदराज) जि.बीड येथे शैक्षणिक वनसहल आयोजित

करण्यात आली. या वनसहलीत रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी. सावंत, डॉ.पी.जी. कावळे, प्रा.विजय गवळी, प्रा.सोमदेव शिंदे यांच्यासह कनिष्ठ महाविद्यालयातील एकूण २२ विद्यार्थी स्वयंसेवक व वरिष्ठ महाविद्यालयतील ७५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला व सहलीचा आनंद घेतला.

**२३) जागतिक मानवी हक्क दिन : (दि. १० डिसेंबर २०१८)**

दि. १० डिसेंबर २०१८ रोजी महाविद्यालयातील रासेयो विभागच्या वतीने जागतीक मानवी हक्क दिन साजरा करण्यात आले. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी विद्यार्थी स्वयंसेवकांना आपल्या जीवनात मानवी हक्क व त्यांचे उपयोग या बाबतीत मार्गदर्शन केले. या प्रसंगी रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी. सावंत, डॉ. पी.जी. कावळे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, विद्यार्थी प्रतिनिधी चव्हाण विष्णू, हारडे अंजली, मोरे प्रतिक्षा, गवळी अनंतऋषी, शेख अरबाज, विशाल जाधव  व इतर विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**२४) अवयवदान रॅली व कार्यक्रम : (दि.१९ डिसेंबर २०१८)**

दि.१९ डिसेंबर २०१८ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील रासेयोच्या विद्यार्थी स्वयंसेवकांनी अवयवदान रॅलीत सक्रीय सहभाग घेतला. ही रॅली भालचंद्र ब्लड बँक पासून शाहू चौक मार्गे राजर्षी शाहू महाविद्यालयापर्यंत आयोजित करण्यात आली. शाहू महाविद्यालयाच्या सभागृहात अवयवदाना बाबतीत अनेक मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळरावजी पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य ई.यू.मासूमदार, डॉ.ए.जे.राजू, उपप्राचार्य प्रा.विलास कांबळे,  रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी. सावंत, डॉ. पी.जी. कावळे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, विद्यार्थी प्रतिनिधी चव्हाण विष्णू, हारडे अंजली, मोरे प्रतिक्षा, गवळी अनंतऋषी, शेख अरबाज, विशाल जाधव  व इतर विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**२५) संत गाडगेबाबा स्मृतिदिनानिमित्त स्वच्छता अभियान : (दि. २० डिसेंबर २०१८)**

दि. २० डिसेंबर २०१८ रोजी महाविद्यालयातील रासेयो विभागाच्या वतीने गाडगेबाबांची पुण्यतिथी साजरी करून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या वेळी रासेयो स्वयंसेवकांनी महाविद्यलयातील वर्ग खोल्यांची स्वच्छता करत गाडगे बाबांच्या स्मृतिदिवस साजरा केला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ई.यू.मासूमदार, डॉ. ए.जे. राजू, उपप्राचार्य प्रा. विलास कांबळे, पर्यवेक्षीका प्रा. सुचिता वाघमारे, रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी. सावंत, डॉ.पी.जी.कावळे, प्रा. व्ही.ए. गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, व महाविद्यालयातील इतर प्राध्यापक आणि विद्यार्थी स्वयंसेवक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

**२६) अपघात ग्रस्त विद्यार्थ्यांना मदत (दि. २५ डिसेंबर २०१८)**

दि. २५ डिसेंबर २०१८ रोजी दगडोजीराव देशमुख चौक, लातूर जवळ राजर्षी शाहू महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनी कु. दिव्या मस्के, रोहीणी मस्के व विद्यार्थी महेश तेलंगे यांचे अपघात झाल्यामुळे यांच्या उपचारसाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे ४४ हजार रूपये आपत्कालीन मदत निधी गोळा करून मदत करण्यात आली. या कार्यासाठी प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. विलास कांबळे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी. सावंत, प्रा.

व्ही.ए. गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, विद्यार्थी प्रतिनिधी विशाल जाधव, निलेश चलमले, चव्हाण विष्णू, मोरे प्रतिक्षा व इतर स्वयंसेवकांनी विशेष सहकार्य केले.

**२७) सात दिवशीय विशेष युवक शिबीर : (दि.२९ डिसेंबर २०१८ ते ४ जानेवारी २०१९)**

**अ) उद्‌घाटन :**

शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर संचलित राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने लातूर तालुक्यातील मौजे कासारगाव येथे पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन आणि स्वच्छ भारत अभियानासाठी विशेष युवक शिबीराचे उद्‌घाटन श्रीमती सुशिलादेवी देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय पाटील यांच्या हस्ते व लातूर मनपाचे आयुक्त कौस्तूभ दिवेगावकर यांच्या उपस्थितीत झाले.

या प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. अजय पाटील म्हणाले की, ग्रामीण भागातील समस्यांचा शोध घेऊन त्या सोडविण्याचा प्रयत्न आजच्या तरुणांनी केला तर त्या समस्या सूटल्याशिवाय राहणार नाहीत. रा.से.यो.च्या विद्यार्थ्यांनी गावातील ग्रामीण भागातील अनुभूती घेऊन प्रामाणिकपणे सेवावृत्ती अंगीकारावी व परिवर्तन घडवून आणावे. देशात चांगले परिवर्तन घडवण्याचे काम फक्त रा.से.यो.चे युवकच करु शकतात, असे ते म्हणाले. आयुक्त दिवेगांवकर यांनीही शिबीरार्थींना मार्गदर्शन करताना सांगितले की, रा.से.यो. च्या युवकांनी संवेदनशिलता जपली पाहिजे व कायदा व्यवस्थेचे स्वत:पालन करुन गावातील ग्रामस्थांना प्रबोधन करीत गावाच्या विकासात हातभार लावला पाहिजे.

या उद्‌घाटन कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ.ई.यु. मासूमदार, डॉ.ए.जे. राजू, उपप्राचार्य विलास कांबळे, रा.से.यो.चे कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी.सावंत, डॉ.पी.जी. कावळे, प्रा.व्ही.ए. गवळी, प्रा.सोमदेव शिंदे, गावचे सरपंच अशोक तुळजापूरे, उपसरपंच जयदेव मोहिते, रा.से.यो.चे विद्यार्थी प्रतिनिधी विशाल जाधव, विष्णू चव्हाण, श्रध्दा स्वामी, प्रतिक्षा मोरे व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.पी.जी. कावळे यांनी केले. सूत्रसंचलन प्रा.सोमदेव शिंदे व विक्रांत शंके यांनी केले तर आभार प्रा.विजय गवळी यांनी मानले.

**ब) शिबीराचे समारोप :**

**वृक्षसंवर्धनातून पाणी टंचाईवर मात करणे शक्य :**

लातूरकरांनी पाण्याचा वनवास भोगला आहे. भविष्यात लातूरमध्ये अशा प्रकारचा दुष्काळ येऊ नये यासाठी लातूर परिसरात वनक्षेत्र वाढविण्यासाठी वृक्ष लागवड करुन त्याचे संवर्धन केले पाहिजे. वृक्ष जमिनीतील पाण्याची पातळी टिकवून ठेवतात. वृक्षांचे प्रमाण कमी झाल्यामुळेच पाण्याच्या गंभीर समस्या निर्माण होतात. म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून जाणिव जागृती करुन वृक्षांची संख्या वाढवणे गरजेचे आहे. कारण वृक्षांचे संवर्धन केले तरच पाणी टंचाईवर मात करणे शक्य आहे, असे मत लातूरचे पोलि उपनिरीक्षक सय्यद ए. रेहमान यांनी व्यक्त केले.

येथील राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे कासारगाव येथे आयोजित पर्यावरण व नैसर्गीक साधनसंपत्तीचे संवर्धन आणि स्वच्छ भारत अभियानासाठी विशेष युवक शिबिराच्या समारोहाप्रसंगी व्यक्त केले. मंचावर शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे सदस्य

अनंत माने, डॉ.सुहास गोरे, सरपंच अशोक सूर्यवंशी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे विद्यापरिषद सदस्य डॉ. अशोक मोटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मौजे कासारगाव येथे दि. २९ डिसेंबर २०१८ ते ०४ जानेवारी २०१९ या दरम्यान झालेल्या सात दिवसीय शिबिरात २० शोष खड्डे खोदले तसेच कासारगाव व हनमंतवाडी या गावात २०० वृक्षारोपांची लागवड करण्यात आली. तसेच गावातील मंदिर परिसर व नाल्यांची साफसफाई करणे, रस्ता अतिक्रमणमुक्त करुन रुंदीकरण करणे, वृक्ष दिंडी काढणे, अंधश्रध्दा निर्मूलनपर प्रायोगिक कार्यक्रम, कवि संम्मेलन, बालक्या बाहूल्यांचा खेळ, सांस्कृतिक व बौध्दिक कार्यक्रम, आरोग्य शिबिर यांसारखे वेगवेगळे कार्यक्रम घेण्यात आले. सदर शिबिर यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ.ए.जे. राजू, उपप्राचार्य डॉ.ई.यु. मासूमदार, उपप्राचार्य विलास कांबळे, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी. सावंत, डॉ.पी.जी. कावळे, प्रा.व्ही.ए. गवळी, प्रा.सोमदेव शिंदे, प्रा.विजय दळवी, प्रा.आर.के. आर्य, डॉ.ओ.व्ही. शहापूरकर, गावचे उपसरपंच डॉ.जयदेव मोहिते, ग्रामसेवक अनंत सूर्यवंशी, पोलिस पाटील प्रभजन केळे, तंटामुक्ती अध्यक्ष अनिल मोहिते, तलाठी दत्ता शिंदे, ग्रामपंचायत सदस्य पृथ्वीराज मोहिते, ज्योती गुटलकर, शकुंतला भगोडे, ग्रामस्थ संजय मोहिते, अच्युत माने, लातूरचे ज्येष्ठ नागरिक सुपर्ण जगताप, रासेयोचे विद्यार्थी प्रतिनिधी विशाल जाधव, विष्णू चव्हाण, प्रतीक्षा मोरे, अंजली हारडे, निलेश चलमले, विक्रांत शंके यांनी विशेष परिश्रम घेतले.

**२८) स्वामी विवेकानंद व राजमाता मॉ जिजाऊ जयंती साजरी : (दि.१२ जानेवारी २०१९)**

दि.१२ जानेवारी २०१९ राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जागतिक युवा दिनानिमित्त स्वामी विवेकानंद व राजमाता मॉ जिजाऊ यांची जयंती साजरी करण्या आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य. डॉ. ए.जे. राजू, डॉ. ई.यू. मासूमदार, उपप्राचार्य प्रा. विलास कांबळे, पर्यवेक्षिका प्रा. सुचिता वाघमारे, प्रा. विजय दळवी रासेयो कार्यक्रमाधिकरी डॉ. के.डी. सावंत, डॉ.पी.जी.कावळे, प्रा. सोमदेव शिंदे व विद्यार्थी प्रतिनिधी मोरे प्रतिक्षा, चव्हाण विषणू, विशाल जाधव इत्यादी उपस्थित होते.

**२९) वार्षिक स्नेह संम्मेलन व गुणगौरव सोहळा : (दि.२१ जानेवारी २०१८)**

दि.२१ जानेवारी २०१९ रोजी महाविद्यालयात वार्षिक स्नेह संम्मेलन व गुणगौरव सोहळा घेण्यात आले. यावेळी विभागीय व राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांना बक्षीस व प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आले. तसेच शै. वर्ष २०१८-१९ मधील सवौत्कृष्ठ विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून सुतार ईश्वर सोमनाथ व हारडे अंजली बालाजी यांची निवड करून त्यांचा प्रमाणपत्र देवून सन्मान करण्यात आला तसेच विद्यार्थी प्रतिनिधी मोरे प्रतिक्षा बळीराम, चव्हाण विष्णू यांचा देखील सन्मान करण्यात आला या बक्षीस वितरण कार्यक्रमात शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे आध्यक्ष डॉ. गोपाळरावजी पाटील. प्राचार्य महादेव गव्हाणे, विक्रांत गोजमगुंडे, डॉ.पी.आर. देशमुख, रासेयो कार्यक्रमाधिकरी डॉ.के.डी.सावंत, डॉ.पी.जी.कावळे, प्रा. सोमदेव शिंदे, व इतर मान्यवर उपस्थित होते. बक्षीसवितरण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रासेयो कार्यक्रमधिकारी प्रा. व्ही.ए.गवळी यांनी केले.

**३०) मतदान जनजागृती व प्रशिक्षण मोहिम : (दि. २४ जानेवारी २०१९)**

राजर्षी शाहू महाविद्यालयात भारत निवडणूक आयोग व व जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, कार्यालय, लातूर यांच्या मार्फत मतदाना संदर्भात जनजागृती करण्यात आली. यावेळी ईव्हीएम/व्हीव्हीपॅट मशीन द्वारे मतदान करणे कसे योग्य आहे. या बाबात प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी.सावंत, प्रा.व्ही.ए.गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, विद्यार्थी प्रतिनिधी कु. हारडे अंजली, श्री. ईश्वरप्रसादन मांडे व निवडणूक अधिकारी उपस्थित होते.

**३१) राज्यप्रजास्ताक दिन संचलन : (दि. २६ जानेवारी २०१९)**

राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलन सोहळा महाराष्ट्र राज्य मुंबई येथे पार पडलेल्या राज्य प्रजासत्ताक दिन संचलन सोहळ्यात महाविद्यालयातील शिवकांत डोनगावे, कोते माधुरे, स्वामी श्रध्दा या तीन विद्यार्थ्यांची निवड होऊन सक्रीय सहभाग नोंदवला.

**३२) राज्यप्रजासत्ताक दिन पथसंचलन : (दि. २६ जानेवारी २०१९)**

दि. २६ जानेवारी २०१९ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात ध्वजारोहनानंतर प्रजसत्ताक दिनानिमित्त वेवेगळ्या विभागाकडून पथसंचलन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थी स्वयंसेवकांनी संपूर्ण भारतातील विविध प्रांतातील देशभक्तांची व सांस्कृतिक वेशभूषा परिधान करून पथसंचलनात सक्रीय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना अल्पोपहार खाऊ देण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य ई.यू. मासूमदार, डॉ. ए.जे. राजू, उपप्राचार्य प्रा. विलास कांबळे, पर्यवेक्षिक प्रा. सुचिता वाघमारे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी. सावंत, डॉ.पी.जी. कावळे, प्रा. व्ही. ए. गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, रासेयोचे सर्वच विद्यार्थी उपस्थित होते.

**३३) राज्य पथसंचलनात सहभाग** (S.R.D.) 2019 :

राज्य प्रजासत्ताक दिन मुंबई येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय पथसंचलन सोहळ्यात रा.से.यों चे स्वयंसेवक शिवकांत डोनगावे, माधुरी कोते व श्रध्दा स्वामी स्वा.रा.ती. म. विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करत सहभाग नोंदवला.

**३४) रस्ता सुरक्षा अभियान रॅली : (दि.०४ फेब्रुवारी २०१९)**

दि. ०४ फेब्रुवारी २०१९ रोजी परिवहन विभाग व पोलीस विभाग लातूर यांच्या वतीने गांधी चौक पोलीस मुख्यालय लातूर ते जिल्हा परिषद लातूर चे सभागृह पर्यंत रस्ता सुरक्षा अभियान रॅलीचे आयोजन करण्यात आले या रॅलीत राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या वेळी जि.प. लातूर च्या सभागृहात जिल्हाधिकारी जी.श्रीकांत व पोलिस निरिक्षक यांनी विद्यार्थ्यांना रस्ता व वाहतुक सुरक्षेविषयी बहुमुल्य मार्गदर्शन केले. रॅली यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. विलास कांबळे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी.सावंत, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, व विद्यार्थी प्रतिनिधी मोरे प्रतिक्षा, विशाल जाधव, चलमले निलेश, आकाश सोनकांबळे यांनी विशेष सहकार्य केले.

**३५) पुलवामा हल्यातील शहीद जवानांना श्रद्धांजली : (दि.१६ फेब्रुवारी २०१९)**

दि.१४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मू कश्मीर येथील पुलवामा हल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पित करण्यासाठी दि.१६ फेब्रुवारी २०१९ रोजी महाविद्यालयाती राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे कार्यक्रम घेण्यात आले. श्रद्धांजली अर्पित करुन शहीदांना अभिवादन करण्यात आले. यावेळी पर्यवेक्षिका प्रा. सुचिता वाघमारे, प्रा. नानासाहेब काळे, प्रा. सुधिर जाधव रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी.सावंत, प्रा.व्ही.ए.गवळी, प्रा.सोमदेव शिंदे, इतर प्राध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधी विक्रांत शंके, विशाल जाधव मोठया संख्येने उपस्थित होते.

**३६) पर्यावरण संवर्धणासाठी सायकल/ नो व्हेईकल डे : (दि. १८ फेब्रुवारी २०१९)**

दि.१८ फेब्रुवारी २०१९ रोजी महाविद्यालयामध्ये पर्यावरण संवर्धन कार्यक्रमाअंतर्गत सायकल डे/नो व्हेईकल डे पाळला गेला. रासेयो विभागाच्या आव्हाणास महाविद्यालयातील सर्व कर्मचाराऱ्यांनी विद्यार्थ्यांनी वाहनांचा उपयोग न करता सायकलीचा उपयोग केला व पर्यावरण संवर्धनात आपले योगदान दिले.

**३७) पर्यावरणीय दृष्टीने महाविद्यालयाचे सशोभिकरणासाठी रासेयो विभागाचा सहभाग : (दि.२३ फेब्रुवारी २०१९)**

पर्यावरणीय दृष्टीने महाविद्यालयाचे सुशोभिकरण करण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी यांनी निधी गोळी केला व दि. २३ फेब्रुवारी २०१९ रोजी ८९९४० रु. जमा करुन महाविद्यालयाच्या विकासात हातभार लावला. या कार्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, डॉ.ए.जे. राजू, उपप्राचार्य डॉ.ई.यु. मासूमदार, उपप्राचार्य प्रा. विलास कांबळे, पर्यवेक्षिका प्रा. सुचिता वाघमरे, प्रा. ओमप्रकाश शहापूरकर, डॉ. अनुजा जाधव, प्रा. के.जी. मस्के, डॉ.डी.बी. सोनकांबळे, प्रा.एस.डी. भंडारे, प्रा. विजय दळवी, प्रा.डी.जी. पालके,रासेयो. कार्यक्रमाधिकारी डॉ. के. डी. सावंत, डॉ.पी.जी. कावळे, प्रा. व्ही.ए. गवळी. प्रा. एस.डी. शिंदे या समन्वयसमितीने विशेष प्रयत्न केले. व महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले.

**३८) जिल्हास्तरीय युवक नेतृत्व गुणविकास शिबीर : (दि. ०१ ते ०५ मार्च २०१९)**

दि. ०१ ते ०५ मार्च २०१९ रोजी जयक्रांती महाविद्यालय लातूर येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या वतीने जिल्हास्तरीय नेतृत्व गुणविकास शिबीराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये राजर्षी शाहू महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागातील जाधव विशाल, बुके शिवानंद, कोते माधुरी, भोसले पूजा, जाधव आरती, सोनकांबळे आकाश, स्वामी श्रध्दा, बनसोडे रागीनी, काळे प्रसाद, बेलकोने पवन, गुट्टे शिवकांत, पवार स्वाती, सोनवणे मंजुश्री इ. विद्यार्थी स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला.

**३९) विद्यापीठस्तरीय युवती नेतृत्व विकास कार्यशाळेत सहभाग :**

स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड व नागनाथ कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, औंढा नागनाथ च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने दि. १० ते १२ मार्च, २०१८ आयोजित युवती नेतृत्व विकास कार्यशाळेत रासेयो स्वयंसेविका माधुरी कोते, श्रध्दा स्वामी आदींनी सक्रीय

सहभाग नोंदवला.

**४०) शहिद दिन साजरा : (दि. २४ मार्च २०१९)**

प्रसिद्ध देशभक्त भगतसिंह, राजगुरु, व सुखदेव यांना अभिवादन करण्यासाठी दि. २४ मार्च २०१९ राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागात शहीद दिन साजरा करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी विक्रांत शंके यांनी भगतसिंग यांचे भूमिका पत्राचे वाचन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, डॉ.ए.जे. राजू, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी. सावंत, प्रा.व्ही.ए. गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, कु.मोरे प्रतिक्षा, अंजली हारडे, प्रा. दवणे व इतर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Principal
Rajarshi Shahu Mahavidyalaya,
LATUR

**कार्यक्रमाधिकारी** **प्राचार्य**




CELEBRATION OF SANT TUKDOJI MAHARAJ JAYNATI .



NSS VOLUNTEERS PATICIPETED IN STATE LEVEL DISASTER MANAGEMENT CAMP AAVHAN CONDUTED BY DR. B.A.M.U. UNIVERSITY , AURANGABAD




EID MILLAN PROGRAM



NSS ORGONISED SHRADHANJALI SABHA ON PULVAMA ATTACK.




NSS  VOLUNTEERS GATHERD IN GANDHI CHOWK IN EKTA RALLY ON OCCASION OF INDEPENDENCE DAY




WE CELEBRATED JAYANTI OF GREAT LITRATE ANNABHAU SATHEA AND THE PUNYATHITI OF FREEDOM FIGHTER LOKMANYA TILAK



**WITH THE REFERENCE OF KERELA FLOOD NSS VOLUNTEERS RASING A FUND FOR FLOOD AFFECTED PEOPLES**




**CONDUCTED TREE PLANTETION PROGRMME COLOBRATED WITH LATUR VRUKSH**



**BLOOD DONATION CAMP CONDUCTED BY NSS .**




**ON THE OCCASION OF RAJARSHI SHAHU MAHARAJ JAYANTI .**



**NSS VOLUNTERS PARTICIPED AND WORKS AS A VOLUNTEER IN ATAL BHAVYA AROGYA SHIBIR ORGONISED BY STATE GOV.**




**CELEBRATED SANT TUKDOJI MAHARAJ PUNYATITHI .**




**NSS VOLUNTEER PARTICIPATED IN STATE REPUBLIC DAY PARADE.**




**VOLLUNTTERS PARTICIPATED IN PATHB SANCHALAN ON 26 JAN. 2019**




**NSS VOLUNTEERS PARTICIPRTED IN HIV AIDS AWERNESS RALLY CAMPIGN**




CELEBRETED JAYANTI OF MAHAMANAV DR.B. R. AMBEDKAR .




NSS VOLUNTEERS VISITED HISTORICAL PLACE KIILE DHARUR DURING ONE DAY KILLE SWACCHATA ABHIYAN




ON THE OCCASION OF FAREWELL OF BODY ORGAN AND BODY DONATION AWERNESS RALLY




NSS VOLUNTEERS PARTICIPATED IN CULTURAL ACTIVITY ON THE OCCASION OF REPUBLIC DAY.



RESPONCEBILITY TOWRDSA THE SOCIAL WELFARE NSS VOLUNTEERS ARE RAISING A FUND FOR OLD AGE.




CELEBRATING JAYANTI OF NATIONAL SAINT GADGE MAHARAJ .




**FILECITATION OF NSS VOLUNTEERS FOR SELECTION IN STATE REPUBLIC DAY PARADE.**




**ON THE OCCASION OF ROAD SAFETY AWARENESS RALLY.**




**NSS VOLUNTTERS PARTICIPATED IN ROAD SAFETY RALLY .**




INAUGRATION  FUNTION OF SPECAIL YOUTH CAMP  NSS



FALICITATION OF SAYYED SIR




INAUGRATION OF VRAKSHA  DINDI  RALLY IN CAMP




**NSS VOLUNTEERS POSTER PRESENTATION NATIONAL INTEGRATION**



**NSS VOLUNTEERS MADE PALKHI ON ENVIRONMENTAL THEME**




**SARPANCH OF KASARGAON EXPRESS IN CAMP**




CELEBRATING SAVITRI BAI PHULE JAYANTI IN CAMP



CONDUCTED TREE PLANTATION PROGRMME CELEBRATED WITH LATUR VRUKSH




NSS VOLUNTEERS WITH SUPRNA JAGTAP IN LIQUIDATION PROGRAM DURING CAMP




**BEST GROUP AWARD BY PRINCIPLE DR.M.H.GAVHANE**




**NSS VOLUNTEER PARTICIPATED IN TREE PLANTATION**




**ORGANISED PROGRAM ON PERSONALITY DEVELOPMENT**




NSS VOLUNTEERS PARTICIPATED IN HIV AIDS AWERNESS RALLY CAMPING



INSEPCTION OF FIELD WORK BY DR. D.D.PAWAR, COORDINATOR NSS S.R.T.M.U.NANDED



NSS VOLUNTEERS ARE ENJOYING CLEANESS DRIVE IN VILLAGE




**ORGANISED GUEST LECTURE OF PROF. B.B.PATIL ON ANTI ADDICTION**




**ORGANISED FREE HEALTH CHECKUP CAMP IN KASARGAON**




**TREE PLANTAION BY THE HANDS OF HONB. VIKRAMJI KALE CONDUTED IN CAM P**